भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी
संगणक विभाग

प्रस्तावना:-

विषय:- **स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविणे या निधी अंतर्गत भिवंडी पूर्व मतदार संघातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांना संगणक संच पुरविणे...**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविणे या निधी अंतर्गत भिवंडी पूर्व मतदार संघातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांना संगणक संच पुरविणेकामी रक्कम रु. ९९,३०,२००/- मात्रच्या प्रस्तावास नियंत्रक व उप आयुक्त(संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी त्यास मान्यता दिलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१(भाग-२)नवि १४, दि. ०६ जून २०२२ रोजी नुसार मा. महासभा व स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचा कार्यभार प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार उपरोक्त खर्चास महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३ (क) नुसार आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेकामी सविनय सादर.

ठराव क्र. ५७१ अ

दिनांक:-20 /०९/२०२४

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविणे या निधी अंतर्गत भिवंडी पूर्व मतदार संघातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांना संगणक संच पुरविणेकामी रक्कम रु. ९९,३०,२००/- नियंत्रक व उप आयुक्त (संगणक), मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र. क्र. ७१ (भाग-२) नवि-१४, दिनांक ०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधिल तरतुदींच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी., भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेअंतर्गत, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधा पुरविणे या निधी अंतर्गत भिवंडी पूर्व मतदार संघातील अनुदानित व विनाअनुदानित शाळांना संगणक संच पुरविणेकामी रक्कम रु. ९९,२८,५६०/- मात्रच्या खर्चास प्रशासकीय ठरावाद्वारे मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.श.महानगरपालिका